आर्थिक गुन्हे शाखा

पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

वृत्तपत्र                                                                                    दि.२७/०२/२०२६

**दि यशवंत को-ऑपरेटीव्ह बँक लि., फलटण, शाखा कराड, जि. सातारा या बँकेमध्ये आर्थिक गुंतवणूक केलेल्या ठेवीदारांना तसेच कर्जदारांना जाहीर आवाहन**

---

दि यशवंत को-ऑपरेटीव्ह बँक लि., फलटण, शाखा कराड, जि. सातारा या बँकमध्ये आर्थिक गुंतवणूक केलेल्या ठेवीदारांची फसवणूक झाल्याबाबत कराड शहर पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. ११६८/२०२५, कलम ६१, ३१६(२), ३१६(४), ३१८(४), ३३६(३), ३३८, ३३९, ३४०(२), ३(५) भारतीय न्याय संहिता, २०२३, कलम ३ व ४ महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थामधील) हितसंबधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा कडे पुढील तपासकामी वर्ग करण्यात आला असुन सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक रऊफ इनामदार हे करीत आहेत.

या बँकेचे कार्यक्षेत्र सातारा जिल्ह्यासहीत सोलापूर, पुणे, सांगली आणि रत्नगिरी जिल्ह्यांत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

दि यशवंत को-ऑपरेटीव्ह बँक लि., फलटण, शाखा कराड, जि. सातारा या बँकमध्ये ज्या गुंतवणूकदारांनी आर्थिक व अन्य गुंतवणूक केली आहे, त्यांनी तसेच फसवणूक झालेल्या कर्जदारांनी दि.०४/०३/२०२६ ते दि.३१/०३/२०२६ या कालावधीत सकाळी १०.०० वा. ते दुपारी १२.३० वाजण्याच्या दरम्यान आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा येथे खालील कागदपत्रांसह चौकशीकामी उपस्थित रहावे.

(१) गुंतवणूक केल्याचा पुरावा, उदाहरणार्थ :- मुळ ठेव पावती, प्रमाणपत्र, ज्या बँकेच्या खात्यातून आर्थिक व्यवहार झालेला आहे, त्या आर्थिक व्यवहाराचे बँक खात्याचे स्टेटमेंट व अन्य पुरावा.
(२) गुंतवणूकदाराचे बँक पासबुकच्या पहिल्या पानाची ठळक व सुस्पष्ट दिसणा-या २ झेरॉक्स प्रती.
(३) गुंतवणूकदाराचे आधारकार्ड
(४) गुंतवणूकदाराचे पॅनकार्ड
(५) गुंतवणूकदारास अंशतः किंवा पुर्णतः किंवा गुंतवणूकदारास मिळालेल्या परताव्याचा पुरावा, उदाहरणार्थ :- पावती, ज्या बँकेच्या खात्यातून आर्थिक व्यवहार झालेला आहे, त्या आर्थिक व्यवहाराचे बँक खात्याचे स्टेटमेंट व अन्य पुरावा.
(६) फसवणूक झालेल्या कर्जदारांनी त्यांच्याकडील कर्जाबाबतची सर्व कागदपत्रे
(७) वर नमूद कागदपत्रांच्या ठळक व सुस्पष्ट दिसणा-या २ झेरॉक्स प्रती.

---

टीप :- सदर बातमी सातारा, सोलापूर, पुणे, सांगली, रत्नगिरी जिल्ह्यातील प्रसिध्दी माध्यमांत प्रसिध्द होण्यासाठी सहकार्य व्हावे, ही विनंती आहे.